जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९०८ दिनांक - ३१/१२/२०२३**

पीसीबी गुन्हे शाखा,पुणे शहर

## हडपसर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **अजय युसुफ मौजण,वय-१९ वर्षे,रा.पाचुंदकर वस्ती,देवाची वाडी,रांजणगावटगणपती,रांजणगाव,ता.शिरूर जि.पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह रांजणगाव एमआयडीसी व हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस स्टेशनच्या हद्दीत चाकु,लोखंडी कोयता यासारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह दुखापतीसह जबरी चोरी, जबरी चोरी, चोरी,घराविषयी आगळीक, बेकायदा हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचे विरूध्द ०४ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये नागपुर मध्यवर्ती कारागृह,नागपुर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमुद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.रविंद्र शेळके ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशन,पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे आधिपत्याखाली पोलीस आधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा. पोलीस आयुक्त यांनी चालु वर्षामध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ७७ कारवाया केल्या आहेत**. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.